# पनवेलमध्ये डिसेंबर अखेरीस होणार महानगर गॅसचा पुरवठा ;
# आमदार प्रशांत ठाकूर यांचा यशस्वी पाठपुरावा

पनवेल (प्रतिनिधी) पनवेल तालुक्यातील खारघर प्रमाणेच कळंबोली कामोठे नविन पनवेल पनवेल शहरात महानगर गॅस निगम लिमिटेड व्दारा राबविल्या जाणाऱ्या महानगर गॅस पाईप लाईन जोडणीची कामे पूर्ण करून येत्या डिसेंबर अखेरपर्यंत गॅस पुरवठा सुरू करण्यात येणार असल्याचे संकेत महानगर गॅसच्या अधिकाऱ्यांनी खांदा कॉलनीमधील सिकेटी महाविद्यालयात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत दिले.
यावेळी सिडकोकडून सहकार्य परवानग्या मिळत नसल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली असता या संदर्भात पाठपुरावा करून गॅस पुरवठा योजनेत येणारे अडथळे दूर करण्यासाठी व सिडकोकडील परवानग्या मिळवून देण्यासाठी सर्व तोपरी सहकार्य करणार असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या योजनेच्या कामासंदर्भात झालेल्या आढावा बैठकीत महानगर गॅसच्या अधिकाऱ्यांना आश्वासित केले. या योजनेचे काम पनवेल तालुक्यात पूर्णत्वास जात असल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी समाधान व्यक्त केले.

या बैठकीस नगराध्यक्षा चारूशिला घरत, माजी उपनगराध्यक्ष अशोक खेर, नगरसेवक मनोहर म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयाचे अधिकारी के.जी.म्हात्रे, पनवेल प्रवासी संघाचे श्रीकांत बापट, यशवंत ठाकरे, श्री बेहरे, रोटरीयन विलास पाटकर यांच्यासह महानगर गॅसचे मुख्य व्यवस्थापक जी.जे.मुर्ती, प्रकल्प व्यवस्थापक विनायक महामने, व्यवस्थापक पी.दिनेश हे अधिकारी उपस्थित होते.

महानगर गॅस पाईपलाईन पनवेल परिसरात लवकरात लवकर कार्यान्वित व्हाव्यात यासाठी महानगर गॅस निगम लिमिटेडने सर्व सोपस्कर प्रक्रिया पूर्ण करावेत. लोकहितांच्या कामांमध्ये निर्माण होणारे अडथळे दूर करावेत व ही सेवा तात्काळ सुरू करावी, अशा सुचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी महानगरच्या अधिकाऱ्यांना दिल्या. पनवेल परिसरात घरगुती वापरासाठी पाईप नॅचरल गॅसबरोबरच सीएनजीचीही पाईपलाईन आणावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. त्यानुसार खारघरमधील काम पूर्ण झाले असुन कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल, खांदा कॉलनी येथे कामे सुरू आहेत. तर पनवेल शहरातील लवकरात लवकर कामे सुरू करून ही गॅस योजना पूर्ण होईल व नागरिक, ग्राहकांना जलदगतीने गॅस पुरवठा होईल, अशी अपेक्षा आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केली.

मुंबईपासून बेलापूर पर्यंत आलेली मुख्य गॅस पाईपलाईन पुढे पनवेल तालुक्यातील शेडूंगपर्यंत नेण्यात येणार आहे. हा प्रकल्प डिसेंबर २०१४ पर्यंत पूर्ण होणार असून यासाठी सिलेंडर गॅस नोंदणी रद्द करून प्रत्येक जोडणीमागे जोडणी शुल्क, नोंदणी शुल्क, सेवा शुल्क असे एकूण अंदाजे साडे सहा हजार रूपये ग्राहकांना भरावे लागतील. पीएनजी ग्राहकांना मीटर जोडणी करून एका स्टॅण्डर्ड क्युबीक मीटर पर हवर (एससीएमएच) युनिटसाठी माफक दराने उपलब्ध होणार आहे.